महाराष्ट्र शासन
वनविभाग

दुरध्वनी क्र. 022 - 25329865
Email : **estccfthane@gmail.com**

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे, वनवृत्त ठाणे यांचे कार्यालय**
वन भवन, मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पुर्व)- 400 603

जा. क्र. कक्ष - 7 (1) / 12/आस्था/जा. 745 सन 2022-23 ठाणे दिनांकः 1 /12/2022

**आदेश**

**विषयः- वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात तदर्थ स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.**

संदर्भ :- 1. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.2001/1887/प्र.क्र.64/01/16-ब, दि.25.05.2004.
2. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-2018/ प्र.क्र.159/कार्या.12, दि.01.08.2019.
3. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07.05.2021
4. नागरी सेवा मंडळ समितीच्या दि. 01.12.2022 रोजीच्या सभेचे इतिवृत्त

दि.07.05.2021 चे शासन निर्णयानुसार दि.20.04.2021 रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन, मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 प्रकरणी दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविलेने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25.05.2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरावीत. यामध्ये जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी दि.25.05.2004 च्या शासन निर्णयाचे तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी/कर्मचारी दि.25.05.2004 रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.25.05.2004 रोजीच्या सेवा जेष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील. तसेच जे दि.25.05.2004 नंतर शासन सेवेत रुजू झाले असतील ते त्यांच्या सेवा प्रवेशाच्या मुळ सेवाजेष्ठतेनुसार पुढील .पदोन्नतीस पात्र ठरतील. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करणेचे निर्देश दिलेले आहेत.

2.00 उपरोक्तांतील निर्देशानूसार वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नती देण्यासाठी दि. 01.09.2022 ते 31.08.2023 या कालावधीकरिता विभागीय पदोन्नती समितीने दि.22.11.2022 रोजी सभा घेवून वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नतीकामी निवडसुची तयार केली आहे. त्यानुसार पदोन्नती करिता पात्र असलेल्या कर्मचा-यांना सद्यस्थितीतील वनपाल संवर्गाची रिक्त असलेली पदे विचारात घेवून नागरी सेवा मंडळाने दि.01.12.2022 रोजी सभा घेवून शिफारशी कळविलेल्या आहेत.

3.00 नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार खालील वनरक्षक यांना वनपाल या पदावर वेतन मॅट्रीकमधील वेतन स्तर एस-8 (25500-81100) या वेतनश्रेणीत केवळ तदर्थ स्वरुपांत पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहेत.

| अ. क्र. | वनरक्षकांचे नांव (सर्वश्री) | जात प्रवर्ग | सद्याचा कार्यरत वन विभाग | पदोन्नती चा प्रवर्ग | तदर्थ पदोन्नती नंतरची पदस्थापना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | परिमंडळ/ पदनाम | वनक्षेत्र | वनविभाग |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | सुर्यकांत कोंडीबा भोसले | अ.जा. | संगाराऊ बोरीवली | खुला | **वनपाल** आंबेसरी | डहाणू | डहाणू |
| 2 | प्रमोद दादाजीराव कदम | खुला | शहापूर | खुला | पोचाडा | विक्रमगड | जव्हार |
| 3 | धिरज कुवरसिंग वळवी | अ.ज. | संगाराऊ | खुला | जायशेत | भाताणे | डहाणू |

1/12/22

मुख्य वनसंरक्षक (प्रा.)

| अ. क्र. | वनरक्षकांचे नांव (सर्वश्री) | जात प्रवर्ग | सद्याचा कार्यरत वन विभाग | पदोन्नती चा प्रवर्ग | तदर्थ पदोन्नती नंतरची पदस्थापना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | परिमंडळ/ पदनाम | वनक्षेत्र | वनविभाग |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 4 | भरत वासुदेव समारंभ | विमाप्र | सा.व.वि. ठाणे | खुला | बोईसर (पूर्व) | बोईसर | डहाणू |
| 5 | राकेश मारुती शेलार | खुला | ठाणे | खुला | गणेशपूरी | भिवंडी | ठाणे |
| 6 | अनंता रामचंद्र भोसले | खुला | ठाणे | खुला | तळेगाव | टोकावडे (उ.) | ठाणे |
| 7 | महेश मधुकर अहिरराव | इमाव | अलिबाग | खुला | कोला | मुरबाड (प.) | ठाणे |
| 8 | भगवान राजाराम जाधव | खुला | अलिबाग | खुला | जिर्णा | वडखळ | अलिबाग |
| 9 | तुकाराम रघुनाथ जाधव | खुला | (वजी) ठाणे | खुला | कार्ले | अलिबाग | अलिबाग |
| 10 | प्रविण तानाजी मोरे | खुला | ठाणे | खुला | बोरगाव | कर्जत (प.) | अलिबाग |
| 11 | संतोष रघूनाथ मोरे | खुला | ठाणे | खुला | आदिवासी मालकी | मुरबाड (पू.) | ठाणे |
| 12 | मंगेश लक्ष्मण शिंदे | खुला | शहापूर | खुला | किरवली | पडघा | ठाणे |
| 13 | विजय धनंजय फल्ले | इमाव | शहापूर | खुला | निष्कासन | विहिगाव | शहापूर |
| 14 | रोशन सुधाकर शिंदे | खुला | संगाराऊ | खुला | अंधेरी | मुंबई | ठाणे |
| 15 | संजय श्रीरंग चव्हाण | खुला | ठाणे | खुला | (रोहयो) कुर्लोद | खोडाळा | जव्हार |
| 16 | दशरथ विठ्ठल कदम | खुला | जव्हार | खुला | ढाढरा | वैतरणा | (वजी) ठाणे |
| 17 | अनिल सिताराम भोसले | खुला | संगाराऊ | खुला | दाभोण (पूर्व) | बोईसर | डहाणू |
| 18 | उदय सदाशिव मोरे. | खुला | संगाराऊ | खुला | सुगवे | कर्जत (प.) | अलिबाग |
| 19 | कैलास गणपत कडु | इमाव | डहाणू | खुला | शिगाव | बोईसर | डहाणू |
| 20 | तुषार भिकाजी कदम | खुला | जव्हार | खुला | गांजा | दहिसर | डहाणू |
| 21 | संतोष आलो पाटील | इमाव | डहाणू | खुला | मनोर | मनोर | डहाणू |
| 22 | कोंडीराम अनाजी शिंदे | खुला | जव्हार | खुला | कुडा | दहिसर | डहाणू |
| 23 | संदीप सिताराम मोरे | खुला | ठाणे | खुला | दहागाव | कल्याण | ठाणे |
| 24 | संतोष मारुती जाधव | खुला | कांदळवन कुर्ला | खुला | वणई | बोईसर | डहाणू |
| 25 | चंद्रकांत मंगळु लोखंडे | अ.ज | डहाणू | खुला | किराट | बोईसर | डहाणू |
| 26 | शरद गोपाळ रसाळ | इमाव | शहापूर | खुला | सारंगपुरी | धसई | शहापूर |
| 27 | दिनेश शंकर पाटील | इमाव | संगाराऊ बोरीवली | खुला | कुडवली रोपवाटीका | मुरबाड (पू.) | ठाणे |
| 28 | सतिश संपतराव जाधव | खुला | ठाणे | खुला | (कांदळवन) गोराई | प. मुंबई | कांदळवन कुर्ला |

Rama Rao
1/12/22

मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
सत्यमेव जयते
ठाणे

| अ. क्र. | वनरक्षकांचे नांव (सर्वश्री) | जात प्रवर्ग | सद्याचा कार्यरत वन विभाग | पदोन्नती चा प्रवर्ग | तदर्थ पदोन्नती नंतरची पदस्थापना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | परिमंडळ/ पदनाम | वनक्षेत्र | वनविभाग |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 29 | प्रशांत विजय गायकर | विमाप्र | रोहा | खुला | चिखलप | श्रीवर्धन | रोहा |
| 30 | शामकांत शांताराम कदम | इमाव | जव्हार | खुला | (ग.प.) सायवन | सायवन | डहाणू |
| 31 | आदेश अशोक पोकळ | इमाव | रोहा | खुला | नांदगाव | फणसाड | (वजी) ठाणे |
| 32 | समीर शशिकांत जाधव | खुला | (वजी) ठाणे | खुला | सा.व. पनवेल | सा.व पनवेल | सा.व. रायगड |
| 33 | विजय भरत देसले | अ.ज | कांदळवन कुर्ला | खुला | टहारपूर | शहापूर | शहापूर |
| 34 | विकास हनुमंत चांदगुडे | खुला | ठाणे | खुला | दहयाळे | कासा | डहाणू |
| 35 | गणेश रघुनाथ दिघे | खुला | (वजी) ठाणे | खुला | खांडस | कर्जत (पू.) | अलिबाग |
| 36 | सचिन हरिबा मोरे | खुला | ठाणे | खुला | बेलवडे | पेण | अलिबाग |
| 37 | हर्षल धनराज कोळी | खुला | जव्हार | खुला | (रोहयो) डेंगाचीमेट | जव्हार (द.) | जव्हार |
| 38 | किरण अशोक भावसार | खुला | जव्हार | खुला | जव्हार | जव्हार (द.) | जव्हार |
| 39 | चेतन प्रकाश आंबरे | खुला | जव्हार | खुला | फिरते पथक जव्हार | जव्हार (द.) | जव्हार |
| 40 | अजय लक्ष्मण महाजन | इमाव | (वजी) पुणे | खुला | पश्चिम घाट | मुरबाड (पू.) | ठाणे |
| 41 | संतोष फुला बच्छाव | खुला | जव्हार | खुला | तिनवीरा | अलिबाग | अलिबाग |
| 42 | संतोष भैरवनाथ पावसे | खुला | ठाणे | खुला | आरागिरणी | रोहा | रोहा |
| 43 | सुशिल बाळकृष्ण विसपुते | इमाव | (संशोधन) वाडा | खुला | सायवन | सायवन | डहाणू |
| 44 | विजय प्रकाश मोरे | खुला | शहापूर | खुला | किनीस्ता | खोडाळा | जव्हार |
| 45 | लक्ष्मीकांत नामदेव केंद्रे | खुला | जव्हार | खुला | आखाडा | पूर्व वाडा | जव्हार |
| 46 | धनेश हनूमंत मेणकर | खुला | ठाणे | खुला | नाणोरे विक्री डेपो | माणगाव | रोहा |
| 47 | किशोर रघुनाथ भोईर | खुला | (संशोधन) वाडा | खुला | शेला | पूर्व वाडा | जव्हार |

**4.00 वरील वनरक्षक यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तदर्थ स्वरूपात पदोन्नती देण्यांत येत आहे.**

1. दि.07.05.2021 चे शासन निर्णयानुसार दि.20.04.2021 रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन, मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 प्रकरणी दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविलेने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25.05.2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरावीत, असे निर्देश आहेत. यास्तव सदरची तदर्थ पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असून, कोणत्याही प्रकारची आगावू सूचना न देता त्यांना वनरक्षक पदावर पदावनत केले जाईल.

Rama Rao
1/12/22

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे

2. मागासवर्गीय कर्मचा-यांचे बाबतीत जातीच्या दाव्यासंबंधी भविष्यात वाद निर्माण झाल्यास संबंधित कर्मचारी जबाबदार राहील व चौकशीत जर संबंधित कर्मचा-यांचे जातीचा दावा खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यांत येवून त्यांना पदावनत करण्यांत येईल.
3. शासन निर्णय क्र. सीबीसी-10/2003/प्र.क्र.91/मावक-5, दिनांक 08.12.2003 अन्वये मागासवर्गीय उमेदवारांकरिता राखीव असलेल्या पदावर निवड केलेल्या उमेदवारांची पदोन्नती देणेपूर्वी त्यांच्या जाती दाव्याची तपासणी करण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र कविसे-10/2006/प्रक्र269/आस्था-3, दि. 07.12.2006 अन्वये जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय कोणत्याही मागासवर्गीय कर्मचारी/ अधिकारी यांना पदोन्नती देण्यात येवू नये असे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने मागासवर्गीय कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच त्यांना पदोन्नती देणेची कार्यवाही करावी.
4. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब,दि.07.05.2021 अन्वये सुचनांचे अधिन राहून तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई इ. ठिकाणी या संबंधातील दावे/याचिका झाली असल्यास सदर प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या आदेशांचे अधिन राहतील.
5. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-1015/प्रक्र.1/95/12, दि.08.06.1995 अन्वये कालबध्द पदोन्नती व शासन निर्णय क्र.वेतन-1999/प्रक्र.-2/92/सेवा-3,दि.20.07.2001 अन्वये आश्वासित प्रगती योजना शासकीय कर्मचा-याना लागू करण्यांत आलेली आहे. उपरोक्त वनरक्षक कर्मचा-यांपैकी ज्या कर्मचा-यानी या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांनी वनरक्षक पदावरुन वनपाल पदावरील पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यांत आलेले कालबध्द पदोन्नतीचे किंवा आश्वासित प्रगती योजनेचे लाभ काढून घेण्यांत येईल याची संबंधितास जाणीव करुन द्यावी.
6. सदरचे आदेश प्राप्त झाल्यापासून वनरक्षकांनी पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाणी 8 दिवसांचे आंत हजर होणे आवश्यक आहे. जे वनरक्षक विहित मुदतीत पदस्थापने ठिकाणी हजर होणार नाहीत, अशा संबंधित कर्मचारी यांचेकडून पदोन्नतीस इच्छूक नसल्याबाबतचे लेखी निवेदन घ्यावे. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/का.12 दि. **12.09.2016** अन्वये पदोन्नती नाकारल्यास संबंधित कर्मचाऱ्याचा तिसऱ्या वर्षी होणाऱ्या निवडसूचीत पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल.
7. कोणत्याही कर्मचाऱ्यास, कोणत्याही कारणास्तव मानीव दिनांक मिळाल्यामुळे अथवा आरक्षणामुळे सेवा जेष्ठतेत अथवा निवडसूचीत बदल झाल्यास कनिष्ठतम कर्मचाऱ्यास कोणतीही पुर्व सूचना न देता निम्न संवर्गात / निम्न पदावर पदावनत करण्यात येईल.
8. संबंधित वनरक्षक यांनी वनपाल पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता केली आहे, याबाबत संबंधित विभागाने खात्री करुन घेतल्यानंतरच त्यांचे पदोन्नतीचे आदेश संबंधितांस निर्गमित करण्यात यावे.
9. संबंधित वनरक्षक यांनी सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसुचना क्र. मभाप-1087/14/सीआर-2/87/20, दि. 31.12.1987 मधील तरतुदीनुसार आणि सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.हिभाप-1976-28, दि.10 जुन 1976 नुसार एतदर्थ मंडळाची हिंदी/मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यांत आली किंवा कसे ? तसेच शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे दि. 13.09.2014 चे परिपत्रकानुसार स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले किंवा कसे? याबाबत सदर कर्मचा-याचे सेवापुस्तकावरुन खात्री करुनच पदोन्नती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.
10. संबंधित विभागांनी सदर वनरक्षक यांचेकडून दि.31.03.2022 अखेरचे मत्ता व दायित्त्व विवरणपत्र प्राप्त करुन घेतल्यानंतरच पदोन्नती देणेबाबतची कार्यवाही करावी.
11. शासन पत्र दि. 04.04.2007 च्या पत्रान्वये वनरक्षक संवर्गातील कर्मचा-यांना एम.एस.सी.आय.टी ची परीक्षा उत्तीर्ण करण्याची अट शिथिल केलेली आहे. यास्तव, सेवा प्रवेश नियम 2011 पुर्वी शासन सेवेत लागलेल्या वनरक्षक व वनपाल यांना सदर शासन पत्रान्वये संगणक अर्हता उत्तीर्ण करण्याची शिथिल केलेली अट आजही कायम आहे. तथापि, सन 2011 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना शासन अधिसूचना दि.30.06.2011 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचे वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असल्याचे महसूल व वन विभाग, शासन पत्र क्र. एफएसटी 12/19/ प्र.क्र.353/फ-4,दि.31.05.2021 अन्वये सुचित करण्यांत आलेले आहे. याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) नागपूर यांनी देखील त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तरी सदर शासन पत्रातील तसेच अप्रमुवसं (प्र-दुसं) नागपूर यांनी दिलेले निर्देश याप्रमाणे खात्री करुनच पदोन्नती आदेश निर्गमित करण्याची दक्षता घ्यावी.
12. <u>संबंधित वनरक्षकांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गाबाबत जात वैधता प्रमाणपत्राची खात्री करावी.</u>

1/12/22

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे
सत्यमेव जयते

13. **वनपाल संवर्गात तदर्थ स्वरुपात पदोन्नती देताना सदर पदोन्नती नियमित होईपर्यंत पदोन्नती देण्यांत आलेल्या वनपालांना सेवाजेष्ठतेसाठी हक्क सांगता येणार नाही.**

5.01 उपरोक्त पदोन्नतीचे आदेश हे रिक्त पदांचे अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत. तरी उप वनसंरक्षक यांनी त्यांचे विभागातील संबंधित वनरक्षक उपरोक्त 1 ते 13 अटींची पुर्तता करीत असल्याची प्रथम खात्री करावी. तसेच 50/55 वयाबाबतचे पुर्नविलोकना अंती पात्र ठरल्यास पदोन्नतीचे आदेश निर्गमित करावेत. तत्पुर्वी **सदर अटी मान्य असल्याचे तसेच या बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे अथवा शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त झाल्यामुळे वनपाल पदावरून वनरक्षक पदावर तात्काळ पदावनत करण्यांत येईल याची जाणीव असल्याचे बंधपत्र संबंधितांकडुन प्राप्त करुन घ्यावे. (बंधपत्र नमुना सोबत जोडला आहे.)** त्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घ्यावी व बंधपत्र सेवापुस्तकात जतन करावे. त्यानंतरच त्यांना वनपाल संवर्गात पदोन्नतीनंतर पदस्थापना देण्यांत आलेल्या ठिकाणी हजर होणेकामी स्थानिक व्यवस्था करुन 02 दिवसांचे आत (अ.क्र.32, 41 व 46 वगळून) कार्यमुक्त करावे. त्यांना पदस्थापनेच्या पदावर तात्काळ हजर होणेबाबत सुचना द्याव्यात. (कार्यमुक्त केल्याचा तारीखवार अहवाल व बंधपत्राची झेरॉक्स प्रत या कार्यालयास लगेच 02 दिवसांचे आत सादर करावी.) तसेच हजर होणेसाठी आलेल्या कर्मचा-यांना त्यांचे पदस्थापनेचे पदावर हजर करुन घ्यावे.

5.02 अ.क्र.32, 41 व 46 कडील पदस्थापनेची पदे दि.31.12.2022 रोजी सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार असल्याने त्या वनपालांचे पदावर पदस्थापना झालेल्या संबंधित वनरक्षक यांना दि.23.12.2022 रोजी नंतर कार्यमुक्त करावे.

6.00 अनुपालन अहवाल वेळीच व एकत्रित सादर करावा.

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे सत्यमेव जयते

Ramarao
(एस.व्ही.रामाराव)
**मुख्य वनसंरक्षक (प्रा), ठाणे**
1/12/22

सहपत्रे:-बंधपत्र नमुना

प्रति,

उप वनसंरक्षक, वनविभाग - ठाणे, शहापूर, डहाणू, जव्हार, अलिबाग व रोहा.

प्रतिलिपी:- 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)/(कांदळवन कक्ष) मुंबई यांचेकडे माहितीसाठी सादर.

2) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त-ठाणे /संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली / उप वनसंरक्षक (वजी) ठाणे व पुणे/ विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण - ठाणे व रायगड / कांदळवन संधारण घटक - कुर्ला / सहाय्यक अनुवंश शास्त्रज्ञ, वन अनुसंधान केंद्र - वाडा यांचेकडे माहिती व तत्सम कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत :- 1. कक्ष-7(3), निर्देशन विभाग, ठाणे. 2. बृहत प्रकरण.

प्रतिलिपी:- प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन बल प्रमुख) म.रा. नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.